## अकोट येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात

**अर्जदार** - सौ. गायत्री ज्ञानेश्वर गोमाशे,

**विरुध्द**

**गैरअर्जदार** - ज्ञानेश्वर रामचंद्र गोमाशे,

## फौ.कि.अर्ज क्र. ९/२०२२ मधील निशाणी ५ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा फौजदारी प्रक्रीया संहिता कलम १२५ प्रमाणे अंतरिम पोटगीचा आदेश मिळण्याकरीता सादर केलेला आहे.

**०२.** अर्जदाराचे असे म्हणणे आहे की तिचे लग्न गैरअर्जदार सोबत समाजातील रितिरिवाजाप्रमाणे दि. ११.३.२००७ रोजी झालेले आहे. लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदारासोबत खानापर येथे नांदावयास आली होती. अर्जदार हिला गैरअर्जदार व त्याच्या कुंटूंबातील सदस्यांनी काही दिवस चांगले वागविले. मात्र नंतर गैरअर्जदार व त्याचे आईवडील अर्जदार हिला म्हणत होते की लग्नात हुंडा कमी दिला, भेटवस्तु दिल्या नाहीत या कारणावरुन त्रास देत होते. गैरअर्जदार व त्याचे आईवडील अर्जदाराला नेहमी अपमानीत करत होते व तिचा मानसिक व शारिरीक छळ करत होते. अर्जदाराला गैरअर्जदारापासुन गर्भधारणा झाली. अर्जदार ही गर्भवती असतांना गैरअर्जदार व त्याचे आईवडील अर्जदाराकडुन घरातील सर्व काम करुन घेत होते तसेच अर्जदाराची योग्यप्रकारे काळजी घेत नव्हते. अर्जदाराला पहिले अपत्य मुलगी झाली व तिचे नाव रेणुका ठेवण्यात आले. अर्जदाराला मुलगी झाल्यावर गैरअर्जदार व त्याचे कुंटूंबातील सदस्य नाराज झाले व अर्जदार हिला मुलगा पाहिजे होता या कारणावरुन दोष देणे सुरु केले आणि त्या कारणावरुन अर्जदाराला मानसिक त्रास देणे सुरु केले. अर्जदाराची माहेरची आर्थिक परिस्थीती जेमतेम असल्याने ती सर्व त्रास निमुटपणे सहन करीत होती. अर्जदार ही गैरअर्जदारासोबत संसार करीत असतांना गैरअर्जदार हा अर्जदाराचे चारीत्र्यावर संशय घेत होता. गैरअर्जदार हा अर्जदाराला मारपीट करीत होता. त्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदारासोबत नांदत असतांना तिला दुसरे अपत्य झाले त्याचे नाव ओम ठेवण्यात आले. गैरअर्जदाराने पातुर व परतवाडा येथे अडत व्यापारी म्हणुन व्यवसाय सुरु केला. गैरर्जदार हा परतवाडा येथे एक ते दिड महिना राहत असतांना त्या काळात गैरअर्जदाराने अर्जदार व तिच्या मुलांची कोणतीही विचारपुस करत नव्हता तसेच तो घरी सुध्दा येत नव्हता. अर्जदाराने गैरअर्जदाराला त्याच्या वागण्याबाबत विचारणा केली असता तो अर्जदाराला शिवीगाळ करत होता. अर्जदाराने गैरअर्जदाराचे आक्षेपार्हकृत्य त्याचे आईला सांगीतल्यामुळे व फोटो दाखविल्यामुळे गैरअर्जदार चिडुन घराबाहेर निघुन गेला. तो काही वेळाने दारु पिवुन घरी आला व त्याने अर्जदाराला अश्लील भाषेत शिवीगाळ करुन बेदम मारपीट केली.

अर्जदाराला गैरर्जदाराने घरातुन हाकलुन देण्याच्या धमक्या दिल्या व तिचा मानसीक, शारिरीक व कौटुंबिक छळ केला आहे. दि. ८.९.२०२० रोजी गैरअर्जदार सकाळी ९ ते १० वाजताच्या दरम्यान अतिशय दारु पिवुन आला व अर्जदाराला मारपीट केली व जिवाने खतम करु टाकतो अशी धमकी दिली आणि अर्जदाराला घराबाहेर हाकलुन दिले व गैरअर्जदाराने दोन्ही मुलांना जबरदस्तीने त्याचे ताब्यात ठेवुन घेतले आहे. अर्जदाराकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदाराकडे शेती आहे तसेच गैरअर्जदार अडत व्यापार करतो. गैरअर्जदार खर्च वजा जाता वार्षीक दहा ते पंधरा लाख उत्पन्न कमवितो. त्यामुळे गैरअर्जदारने अर्जदाराला दरमहा रु. २०,०००/- अंतरीम पोटगी म्हणुन द्यावे अशी तिने प्रस्तुत अर्जात विनंती केलेली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जास गैरअर्जदाराने निशाणी ०९ कडे त्याचे म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की गैरअर्जदाराचे लग्न अर्जदारासोबत दि. ११.३.२००७ रोजी झालेले आहे. मात्र त्याने अर्जातील इतर मजकुर नाकारलेला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की अर्जदार गैरअर्जदाराकडे नांदत असतांना सुरुवातीपासुन वेगळे राहण्याचा तगादा लावत होती. अर्जदार ही अर्जदारासोबत नेहमी वाद करीत होती. तसेच अर्जदार ही गैरअर्जदारासोबत मुलांच्या शिक्षणाकरीता अकोला येथे जाण्याकरीता हट्ट करत होती. गैरअर्जदार हा अर्जदाराला नेहमी समजावण्याचा प्रयत्न करीत होता परंतु अर्जदार ही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती. अर्जदाराचा अट्टाहास पुर्ण होत नाही हे पाहुन अर्जदार घरातील कामे करीत नव्हती तसेच गैरअर्जदाराचे आईवडीलांना घालुन पाडून व अपमानास्पद वागणुक देत होती. घरातील कामाबाबत गैरअर्जदाराचे आईने अर्जदाराला काही बोलल्यास अर्जदार ही गैरअर्जदाराचे आईला शिवीगाळ करुन तिचा अपमान करत होती. अर्जदाराचे फोनवर बोलण्यास कोणी करत तिला टोकल्यास ती गैरअर्जदार व त्याच्या आईवडीलांसोबत भांडण करीत होती, शिव्या देत होती व गैरअर्जदार आणि त्याच्या वडीलांना खोट्या केसमध्ये अडकविण्याचा धमक्या देत होती. अर्जदाराने परपुरुषांसोबत संगनमत करुन गैरअर्जदारविरुध्द खोटी तक्रार दाखल केली. त्या तक्रारीवरुन गैरअर्जदार याचे विरुध्द पोलीस ठाणे पातुर येथे अप.क्र.३२/२०२१ कलम ४५०, ३०७, २९४, ४२७, १०९ प्रमाणे गुन्हा दाखल झाला. अर्जदाराच्या सदर वागणुकीमुळे तिची मुले तिच्या सोबत राहण्यास तयार नाहीत. अर्जदार हिने तिच्या मुलांसोबत कधी बोलण्याचा व भेटण्याचा प्रयत्न केला नाही. यावरुन अर्जदार ही गैरअर्जदारसोबत संसार करायचा नाही असे दिसते. गैरअर्जदार हा मजुरीचे काम करतो व त्यापासुन होणारे उत्पन्नातुन दोन्ही मुलांचे व वृध्द आईवडीलांचे पालनपोषण करतो. गैरअर्जदाराने अर्जदारास कोणत्याही प्रकारे शारीरीक व मानसीक त्रास दिलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०४.** दोन्ही बाजुच्या सुविद्य विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०५. माझ्यासमोर खालील वादप्रश्न उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष हे कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार प्रथमदर्शनी हे शाबीत करते काय की गैरअर्जदाराने अर्जदाराचा सांभाळ करण्यास नकार दिला आहे व तो अर्जदाराला खावटी देण्यास समर्थ आहे काय? | **होय.** |
| २. | अर्जदार पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास पोटगीची रक्कम किती ? | **होय. दरमहा रक्कम रुपये २५००/-.** |
| ३. | अंतिम आदेश काय ? | **अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>वादप्रश्न क्र. १ करीता</u>**

०६. गैरअर्जदार याने अर्जदाराचा सांभाळ करण्यास निष्काळजीपणा व नकार दिल्याचे सकृतदर्शनी शाबीत होणे गरजचे आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की गैरअर्जदार व त्याचे आईवडील तिला लहान सहान कारणांवरुन त्रास द्यायचे, अपमानीत करायचे व तिचा शारिरीक व मानसीक छळ करायचे. तसेच अर्जदारास पहिली मुलगी झाल्यावर त्यांनी मुलगा पाहिजे या कारणावरुन तिला दोष देणे व मानसिक त्रास देणे सुरु केले. गैरअर्जदार हा त्याच्या व्यवसायानिमित्त पातुर व परतवाडा येथे राहायचा. मात्र त्या काळात अर्जदाराची व त्याच्या मुलांची त्याने कोणतीही काळजी घेतली नाही व विचारपुस केली नाही. दि. ८.९.२०२० रोजी गैरअर्जदाराने दारु पिवुन येवुन अर्जदारास मारहाण केली व मुलांना जबदरस्तीने ताब्यात ठेवुन घेतले. तसेच त्याने त्यादिवशी अर्जदारास घराबाहेर हाकलुन दिलेले आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराचे सर्व आरोप फेटाळलेले आहेत . मात्र उभयपक्षकारांच्या वाद कथनांवरुन ही बाब स्पष्ट होती की अर्जदार ही गैरअर्जदारासोबत तिच्या सासरी राहत नाही. तिने तिचे सासरचे घर स्वतःहुन सोडले की गैरअर्जदाराने तिला हाकलुन दिले ही बाब संपरिक्षेअंती उभयपक्षकारांच्या पुराव्यावरुन निष्पन्न होणार आहे. मात्र प्रस्तुत प्रकरणाचा निर्णय नजीकच्या काळात होण्याची शक्यता नाही. त्यामुळे अर्जदाराच्या उर्दरनिर्वाहासाठी गैरअर्जदाराने व्यवस्था करणे अपेक्षीत आहे. मात्र त्याने तसे काहीही केलेले नाही असे प्रथन दर्शनी दिसते. अशा परिस्थीतीत गैरअर्जदार हा खावटी देण्यास समर्थ असतांना तो अर्जदाराचा सांभाळ करण्यास नकार देत आहे याबाबी प्रथमदर्शनी शाबीत होतात असे मला वाटते. सबब मी वाद प्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र. २ करीता**

**७.** अर्जदाराने प्रस्तुत अर्जान्वये दरमहा रक्कम रुपये २०,०००/- च्या पोटगीची मागणी केलेली आहे. निर्वाहभत्ता म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि औषधोपचार यासाठी करण्यात येणारी आर्थिक तरतूद होय. पत्नीचे व स्वतःच्या अज्ञान अपत्यांचे पालनपोषण करणे हे प्रत्येक पती व पित्याचे नैतिक कर्तव्य असते. त्यामुळे वरील बाबींनुसार अर्जदार अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे किंवा नाही हे पाहावे लागेल.

८. वादप्रश्न क्र. १ च्या निष्कर्षान्वये गैरअर्जदारानी अर्जदाराचा सकृतदर्शनी सांभाळ करण्यात नकार दिला हे शाबीत झालेले आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदाराकडे शेती आहे तसेच तो अडतचा व्यवसाय करतो व त्यातुन त्याला दरमहा १० ते १५ हजार कमवितो असे अर्जदाराचे म्हणणे आहे. सदर बाब गैरअर्जदार याने नाकारलेली आहे.

९. गैरअर्जदाराचे शेती व व्यवसायासंबंधी अथवा त्याला त्यातून निश्चित किती उत्पन्न मिळते याबाबत अर्जदाराने प्रथमदर्शनी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे खरोखरच त्याला १० ते १५ लाख रुपये दरवर्षी मिळतात या निष्कर्षापर्यत या स्थितीला पोहोचता येणार नाही. मात्र तो शारीरिक दृष्टया धडधाकट आहे. त्यामुळे त्याला कोणताही कामधंदा नाही असे म्हणून तो अर्जदाराच्या पालनपोषणाची जबाबदारी टाळू शकत नाही. त्याचेवर त्याचे आईवडीलांची जबाबदारी आहे हे दाखवायला त्याने अभिलेखावर काहीही आणलेले नाही. मात्र अर्जदाराची दोन्ही मुले त्याचे कडे असल्याचे अर्जदाराच्या कथनावरुन दिसते. उभयपक्षकारांचे राहणीमानाचा विचार करता तसेच उपरोक्त परिस्थीती पाहता गैरअर्जदाराने अर्जदारास दरमहा रक्कम रुपये २,५००/- एवढी रक्कम अंतरिम पोटगी म्हणून देणे शक्य आहे असे मला वाटते. सबब वादप्रश्न क्र. २ चा निष्कर्ष वरील विवेचनाच्या अनुषंगाने नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र. ३ करीता**

**१०.** वादप्रश्न क्र.१ व २ च्या निष्कर्षान्वये प्रस्तुत अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

गैरअर्जदाराने अर्जदारास अर्ज दाखल तारखे पासून अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रुपये २५००/- (दोन हजार पाचशे मात्र) या प्रकरणाच्या अंतिम सुनावणीपर्यत देण्याचे याद्वारे निर्देशित करण्यात येते.

प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून गैरअर्जदाराने अर्जदारास रक्कम रुपये १०००/- (एक हजार मात्र) द्यावयाची आहे.

सदर प्रकरण पुढे चालविण्यास अर्जदाराने विलंब केल्यास तिला मंजूर करण्यात आलेला तुर्तातूर्त अनुतोष रद्द करण्यात येईल.

या आदेशाची प्रत अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी.

BHANUPRATAP B. CHOUHAN
Digitally signed by BHANUPRATAP B. CHOUHAN
Date: 2022.11.05 15:43:49 +0530

अकोट
दिनांक ०५/११/२०२२

भानुप्रताप ब. चौहान
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मालवण